# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-४३६-२०२४ दिनांक-१७/११/२०२४

## प्रेस नोट

### "भारतीय चलनाच्या ५०० रुपये दराच्या ५१,७६,००० रुपये किंमतीच्या बनावट नोटा भारतीय बाजार पेठेत वितरीत करण्यासाठी येणाऱ्या आरोपीस मिरारोड येथुन अटक करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष यांना यश."

आज दिनांक १५.११.२०२४ रोजी पोउपनिरी/हितेंद्र विचारे व सफौ/मनोहर तावरे यांचे गोपनीय बातमीदाराचे मार्फतीने मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्षाचे पथकाला माहीती मिळाली की, इसम नामे आर्यन हा भारतीय चलनाच्या ५०० रुपये दराच्या बनावट नोटा घेवून आज दिनांक १५.११.२०२४ रोजी ०३.०० वाजेचे सुमारास डॉन बास्को स्कुल जवळ, मुन्शी कपाऊन्ड व प्रेझेन्ट पार्क रोडकडे जाणारे रस्त्यावर, मिरारोड पुर्व येथे बॅगेमध्ये ५०० रुपये दराच्या बनावट नोटा वितरीत करण्यासाठी घेवुन येणार आहे. सदर मिळालेल्या बातमीवरुन नमुद ठिकाणी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सफौ. मनोहर तावरे, पोहवा. संग्रामसिंह गायकवाड, पोहवा. प्रविणराज पवार, पोहवा. हनुमंत सुर्यवंशी, पोहवा. सतिष जगताप, पोशि. साकेत माघाडे या पोलीस पथकाने नमुद ठिकाणी सापळा लावला.

सदर ठिकाणी बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीतील वर्णनाप्रमाणे एक इसम काळी रंगाची रेक्झीनची बॅग घेवुन पायी चालत येताना दिसला. त्याचा संशय आल्याने त्यास पाहुन लागलीच पोलीस पथकाने त्यास चपळाईने ०३.२० वाजता ताब्यात घेतले.

नमुद आरोपीचे नाव पत्ता विचारुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता अंगझडतीत त्याचेकडील रेक्झीनचे बॅगमध्ये वेगवेगळे नंबरचे भारतीय चलनाच्या ५०० रुपये दराच्या १०,३५२ नोटा मिळून आल्या असून त्यांची भारतीय बाजारातील किमंत रुपये ५१,७६,०००/- अशी आहे. सदर नोटांची बारकाईने पाहणी केली असता त्या बनावट असल्याबाबत प्रथमदर्शनी खात्री झाल्याने नमुद इसमास ताब्यात घेवून त्याचेकडील सर्व बनावट नोटा व अंगझडतीतील दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आर्यन मनसुखभाई जाबुचा, वय-१९ वर्षे रा.प्लॉट क्र.६७, सरीता सोसायटी, स्ट्रीट क्रमांक ५, भावनगर, गुजरात याचे विरुध्द सफौ. मनोहर बाळासाहेब तावरे, मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्ष यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पो.स्टे. गुनाक्र. ५६८/२०२४ भारतीय न्याय संहीता १७९, १८० प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी काशिमीरा पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. मदन बल्लाळ, सपोआ (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि. धनंजय पोरे, सपोनि. दत्तात्रय सरक,नितीन बेन्द्रे, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सहापोउपनिरी.श्रीमंत जेधे, मनोहर तावरे,आसीफ मुल्ला, पोहवा.संग्रामसिह गायकवाड, प्रविणराज पवार, हनुमंत सुर्यवंशी,सतिष जगताप, संतोष मदने, राजाराम काळे, राजविर संधु, महेश वेल्हे, अनिल नागरे, शिवाजी पाटील, गोवींद केंद्रे, पोशि.साकेत माघाडे, नितीन राठोड, अंगद मुळे, अखिल सुतार, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.




----oooo----